RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ८, अंक ९२(५)] शुक्रवार, ऑक्टोबर १४, २०२२/आश्विन २२, शके १९४४ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक १९४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय

मुंबई ४०० ०३२, दिनांक १४ ऑक्टोबर, २०२२.

**अधिसूचना**

**प्राण्यांमधील संक्रामक व सांसर्गिक रोगांस प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम, २००९.**

क्रमांक संकीर्ण-२०२०/ प्र.क्र. १४३/ पदुम - ४.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाची शासन अधिसूचना क्रमांक संकीर्ण-२०२०/ प्र.क्र. ५३/ पदुम- ४, दिनांक ८ सप्टेंबर २०२२ (यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा केलेला आहे) अन्वये गुरे व म्हशींमधील लम्पी चर्मरोग, जो की प्राण्यांमधील संक्रामक व सांसर्गिक रोगांस प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम, २००९ (२००९ चा २७) (यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम"असा केलेला आहे) अन्वये अनुसूचीत रोग म्हणून घोषित केलेला असून, त्यासाठी संपूर्ण राज्याचे क्षेत्र "नियंत्रित क्षेत्र" म्हणून घोषित करण्यात आलेले आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यात मोठया प्रमाणात ऊस उत्पादक तसेच साखर कारखाने असून साखर कारखान्यांचा गळीत हंगाम लवकरच सुरु होत आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यातील मोठ्या प्रमाणावर ऊसतोड मजूर त्यांच्या पशुधनासह साखर कारखान्यांकडे ऊसतोडणी व ऊस वाहतुकीसाठी स्थलांतरीत होत असतात;

आणि ज्याअर्थी, ऊसतोड मजूर तसेच शेतकऱ्यांकडील गुरांची त्यांच्या ठिकाणापासून तसेच ऊस मळ्यांपासून साखर कारखान्यांकडे वाहतूक प्रतिबंधीत केल्यास त्याचा गळीत हंगामावर आणि राज्याच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम होऊ शकतो;

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाची कलमे ६ व ७ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे, उक्त अधिसूचनेत खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :-

" उक्त अधिसूचनेच्या परिच्छेद (क) मधील, " सर्व गुरे" या मजकुराऐवजी " ऊसतोड मजूर आणि शेतकऱ्यांची त्यांच्या ठिकाणापासून तसेच ऊस मळयांपासून साखर कारखान्यांकडे जाणारी गुरे वगळून इतर गुरे" हा मजकूर दाखल करण्यात येईल."

या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाकडून स्वतंत्र आदेशाद्वारे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**जगदीश गुप्ता,**
शासनाचे प्रधान सचिव.

## AGRICULTURE, ANIMAL HUSBANDRY, DAIRY DEVELOPMENT AND FISHERIES DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 14th October, 2022.

*NOTIFICATION*

Prevention and Control of Infectious and Contagious Diseases in Animals Act, 2009.

No. DIS-2022/C.R.143/ADF-4.—Whereas, the Government of Maharashtra has *vide* Government Notification, Agriculture, Animal Husbandry, Dairy Development and Fisheries Department, No. SANKIRNA-2020/C.R.53/ADF-4, dated the 8th September, 2022 (hereinafter referred to as "the said notification" ), declared that the whole State of Maharashtra as the "*Controlled Area*" in respect of the Lumpy Skin Disease (LSD), which is a Scheduled Disease declared under the Prevention and Control of Infectious and Contagious Diseases in Animals Act, 2009 (27 of 2009) (hereinafter referred to as the said Act), for cattle and buffaloes ;

And whereas, in the State of Maharashtra, there are huge number of sugarcane producers and sugar factories, and the sugarcane crushing season is going to start very soon ;

And whereas, the large number of labour families migrates from their place to the sugar factories in the State of Maharashtra with their livestock for cutting sugarcane and its transportation to the sugar factories ;

And whereas, if the movements of the cattle of sugarcane labours and farmers are prohibited from their place to sugar factories and the farm of sugarcane to sugar factory, then it may affect the sugarcane crushing season and may also affect the economy of the State of Maharashtra ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sections 6 and 7 of the said Act, the Government of Maharashtra hereby amends the said notification as follows namely :—

" In the said notification, paragraph (a) for the word "all the cattle" the words "all the cattle except the cattle of sugarcane labourers and farmers, moving from their place to sugar factories and farm of sugarcane to sugar factory" shall be substituted", subject to the guidelines issued by Government of Maharashtra by a separate order.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

JAGDISH GUPTA,
Principal Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.